मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

## थोडक्यात

# मांगीलाल शर्मा विद्यालयामध्ये सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा संपन्न



**अकोला** : मांगीलाल शर्मा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अकोला येथे दिनांक ५ ऑगस्टला विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. इयत्ता ८ ते १० च्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय व क्विक हील फाऊंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल येथुन आलेले सायबर वॉरियर्स संघातील साक्षी फाटकर आणि हर्षा बिहाडे यांनी मोबाईल व इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांबद्दल महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुक, एटीएम वापर, ऑनलाइन गेम्स, तसेच फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार व त्यापासून बचावाचे मार्ग समजावून सांगितले.विद्यार्थ्यांना टू-स्टेप व्हेरिफिकेशन, टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन, तसेच सिक्युरिटी सर्टिफिकेट असलेल्या वेबसाइट्सचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांच्या विविध शंका निरसन करून, दैनंदिन जीवनात वापरण्यासाठी उपयुक्त सुरक्षा टिप्सही सांगण्यात आल्या.ही कार्यशाळा मांगीलाल शर्मा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य भानुदास यनावर यांच्या परवानगीने आयोजित करण्यात आली होती.हा कार्यक्रम शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. दीसी पेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मोठ्या उपस्थितीत कार्यशाळा अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण झाली.